# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २२/०५/२०२३

- **विनयभंग :-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ७ | १० |
| १. | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ६८५/२०२३ कलम ३५४ , ३५४ ड , ३८४, ३८५,३२३, ५०६ ब , ५०४ भादवी ८,१२ पोक्सो | दि २१.५.२०२३ चे १४.०० वा दरम्यान<br><br>दि २१.५.२०२३ चे २१.५३ वा | गौरव पवार रा देशमुखलॉन जवळ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठीकानी मी समक्ष पोस्टेला येवुन जबानी रीर्पोट देतो की` माझ्ी ओळख माझ्या मैत्रीणीच्या ग्रुपमधील जुन महीण्यामध्ये कॉलेज चालु झाले असता गौरव पवार रा देशमुखलॉन जवळ अम . याच्याशी ओळख झाली तो त्याचे मोक्र वरून माझ्या मोक्र  वर मला नेहमी फोन करत होता. माझ्ी नेहमी मोबाइल फोनवर त्याचेसोबत गोष्टी होत होत्या व मला म्हणत होता तु मला आवडते मी तुझ्या सोबत प्रेम करतो व मी सुध्दा त्याचेवर प्रेम करीत होती काही दीवसानंतर त्याने मला म्हटले की तु तुझ्या घरून माझ्यासाठी मोबाइल घेवुन ये नाहीतर मी तुला मारेल असे मला कॉलेज मध्ये म्हटले होते व मला तुझ्या घरून पैसे घेवुन ये असे म्हणत होता मी त्याला ६०० रू कॉलेज मध्ये नेवुन दीले परंतु त्याची पैसे मांगण्याची सवय वाढत होती व तो मला म्हणायचा तु आइ वडीलांना सांगीतल तर मी तुझ्या घरी येवुन चाकुने जिवाने मारुन टाकीन असे म्हणुन धमकी देतो मी त्याला वीओ कंपनीचा व एक रीलायन्स कंपनीचा असे दोन मोबाइल व ६०० रू सुध्दा दीले त्याने मला दि १४ एप्रील २०२३ रोजी मला मोबाइल व पैसे आनले काय असे त्याने वीचारले. आता मी नाही म्हटले तर त्याने मला लाथा बुक्यांनी पाठीवर मारहान केली त्यामुळे मी त्याला म्हटले मी आता तुझयावर प्रेम करीत नाही मी तुझ्या त्रासाला कंटाळले तर तो मला म्हणाला तु कशी काय माझ्याशी प्रेमसंबंध तोडतो मी पाहतो जर माझ्यावर प्रेम केले नाही तर मी तुला एखादया दिवशी जिवाने मारून टाकीन आज रोजी दि २१.५.२०२३ रोजी०२.००वा दरम्यान माझ्या घरून दुध पॉकींट आणण्याकरीता पायदळ जात असतांना गौरव पवार याने घोंगडे दुकानासमोर त्याचे मोटर सायकलने माझा पाठीमागे येवुन माझा पाठलाग केला व त्याने मोटर सायकल माझ्या आडवी केली व माझा हात पकडला व माझा वीनयभंग केला व त्याने माझा हात पीरगळला व मला म्हणाला की तुझ्या जवळचा मोबाइल दे अशी धमकी दीली व शीवीगाळ केली व मी त्याला घाबरून माझ्या जवळचा मोबाइल दीला की अं ७०००रू मी त्याला थांबण्याबाबत म्हटले तो थांबला नाही त्याची मोटर सायकल घेवुन नीघुन गेला मी माझ्या आइ वडीलांना सांगीतले व पोस्टेला आली वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ वाहन चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. राजापेठ , अप. क्रमांक 476/2023 कलम 379 भादवि | गोसावी कॉलनी अमरावती | दि. 19/05/2023 चे 19/00वा दरम्यान दि 21/05/23 चे 17.06 | आदेश बाबारावजी पवार वय 46वर्ष धंदा- इलेक्ट्रिक कॉन्ट्रक्टर रा गणेशनगर सुतगिरणी रोड अमरावती | अज्ञात | मी समक्ष पोस्टे ला येवुन जबानी रिपोर्ट देतो कि वर नमुद ठिकाणी राहतो. व इलेक्ट्रिक कॉन्ट्रक्टर म्हणुन काम करतो. माधा साळा नामे ऋशीकेश दिलीप पौड हा माजे घरी शिकायला आहे दि.19/05/2023रोजी संध्याकाळी 7/00वा चे दरम्यान घराशेजारील गोसावी कॉलनीचे गार्डन असल्याने सायकलने गेला गार्डमध्ये फिरुन अर्धा तासाने 7/30वा दरम्यान परत सायकलजवळ आला असता सायकल दिसली नाही माझी सायकल हिरो होटेज कंपनीची फ्रेम न. LNF61981कि. 5000/-रु ची काळया पिवळया रंगाची असलेली कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली ति आजपावेतो मिळुन आली नाही करीता तक्रार देत आहो कार्यवाही व्हावी. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

अपघात :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ३ | पो.स्टे. राजापेठ अप. क्रमांक 475/2023 कलम 279,337भादवि | अमरावती | दि. 09/05/2023 चे 16/30वा दरम्यान दि 21/05/23 चे 17.02 | एक महिला | अक्टिव्हा गाडी क्रमांक MH-27 CD -5603 चा चालक | मीसमक्ष पोलीस स्टेशनाला हजर येवुन जबानी रिपोर्ट देते माझे पतीचा मित्र यांनी माझे पतीला घरी घेवुन आले त्यांना डोक्याला डाव्या बाजुला व पोटाला मार लागलेला दिसत होता म्हणुन मी माझे पतीला विचारले वरुन सांगितले कि रेल्वे स्टेशन अमरावती येथे जात असतांना व्दारकानाथ कॉलनी शंकरनगर रोडवर व्दापका कॉलनी कडुन टु व्हिलर गाडी MH27CD 5603 अक्टिव्हा डावे साईटने आली व माझे पतीचे गाडीला धडक देवुन अपगात केला असे सांगितले मी डॉक्टर असल्याने त्याचा प्राथमिक उपचार घरीच केला त्यावेळी माझे पती बोलत नव्हते म्हणुन मीदि. 11/05/2023रोजी डॉ कहाड सर यांचे कडे सोनोग्राफी केली सिटी स्कॅन डॉ ढवळे गणपती हस्पिटल रिपोर्ट आल्यानंतर डॉ लोखंडे सर इर्विन चौक खापर्डे बगीचा यांना दाखविले व त्यांनी पोटाचे ऑपरेशन करायचे आहे म्हणुन अक्झॉन हॉस्पिटल अडमिट करुन त्याच दिवशी ऑपरेशन केले सद्या माझे पतीचे उपचार अक्झॉन हॉस्पिटल मध्ये ICU मध्ये चालु आहे. माझे पतीची तब्येत जास्त असल्याने मी पोलीस स्टेशन ला रिपोर्ट देण्यास आली नाही आज रोजी येवुन रिपोर्ट देत आहे कार्यवाही अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे बडनेरा अप.क्र. ३७४/२३ कलम २७९ १४३ २९४ ३५२ ४२७ ५०६ भादवी. | चक्रधर पेट्रोलपंप सुपर हायवे रोड बडनेरा | घटना ता.वेळ - दि.२१.०५.२०२३ चे १४.३० वा.<br><br>माहिती ता.वेळ दि.२१.०५.२०२३ चे १५.३० वा.<br>दाखल ता.वेळ दि.२१.०५.२०२३ चे १८.२८वा | मोहम्मद साजीद अब्दुल सईद वय-४७ र्वष धंदा- विटभटटी रा. नुरनगर जुनी वस्ती बडनेरा | एम एच २७ टी ५५४८ हिरो होंडा चा चालक झ ंडु सोबत चा र ते पाच लोक | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद आरोपीने त्याच्या ताब्यातील आँटो क्रएम एच २७ टी ५५४८ हिरो होंडा चा चालक हा भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन येणा-या जाणा-या लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल किंवा एखादा अपघात होईल अशा स्थितीत चालवितांना मिळुन आला. मोटार सायकल चालक हा खाली पडल्याने फि त्याला उचले तो काठेवाड असुन फि व त्याने त्याची मो सा उचलुन बाजुला केली व त्याने ४-५ लोकांना फोन करुन बोलावले तर त्यापैकी झंडु नावाचे इसमाने पुंण नाव माहीत नाही याने गैरकायदेची मंडळी जमवुन फि. ला अश्लील भाषेत शिवीगाळ केली तसेच फियाट लिनन कंपनीची गाडी क्र एम एच १४ ई व्ही ७५१४ ला समोरुन धडक दिली त्यामुळे माझ्या गाडीचे उजव्या बाजुचे समोरल हेडलाईटचे खलचे बफर फटले वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | अप क्र. ३६५/२०२३ कलम ६५(ई) म.दा.का. | अमर कॉलनी चौक जुना बायपास रोड अमरावती | दि २१/०५/२०२३ चे २०.०५.वा | दि. २१/०५/२०२३ चे २२.०३वा | सरतर्फे पो.हे.कॉ. योगेश श्रीवास ब.नं.१०१५ पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | हेमंत दुर्योधन गारोडे वय ४१ ४५ वर्ष, रा. रा अमरकॉलनी जुना बायपास रोड अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादी हे मा. व.पो.नि.सा.यांचे आदेशाने पो.स्टे. फ्रेजरपुरा हद्दित डी.बी. पथकातील कर्मचारी सह पेट्रोलींग करित असतांना एका गुप्त बातमीदार कडुन खात्रीलायक खबर मिळाल्या वरुन नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी आरोपी ो वर प्रो.रेड केली असता पंचासमक्ष त्याचे ताब्यातुन देशी दारु १८०एम.एल. ११ पावट्या प्रत्येकी/-रु. प्रमाणे एकुण किं.अं.८८०/-रु. चा प्रोव्ही माल जप्त करण्यात आला नमुद आरोपी हिचे कृत्य कलम ६५(ई)म.दा.का. प्रमाणे होत असल्याने त्याचें विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | पोस्टे बडनेरा | अप.क्र.३७ ७/२३ कलम ६५ ई महा. दा का. | ग्राम कवठा बहाळे ता भातकुली जि अमरावती | घटना ता.वेळ - दि.२१.०५ .२०२३ चे १८.३० वा. | दाखल ता.वेळ - दि.२१. ०५.२० २३ चे २२.३० वा. | सरर्तफे नापोशि शश्रीकांत शेळके ब.न.१३६० पो स्टे बडनेरा अम श | संतोष देवीदास वानखडे वय-४५ रा. ग्राम कवठा बहाळे ता भातकुली जि अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना २४ नग देशी दारु बॉबी संत्राच्या १८० मि.लीच्या सिलबंद काचेच्या बॉटल कि.अं. १६८० रु. रू चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल |
| ३. | पोस्टे. नांदगाव पेठ | अप.न. १८६/२०२ ३ कलम ६५(ई) मदाका | फत्तेपुर शिवणगाव | दि. २१/०५/२ ०२३ चे १९.३० वा. | दि. २१/०५ /२०२३ चे २२.४८ | पो.उपनि. गजानन लोकडे वय २८ वर्ष पोस्टे. नांदगाव पेठ | ओंकार उकंडराव खडसे वय ६५ वर्ष रा. फत्तेपुर शिवणगाव ता. जि. अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहेकी दि. २१/०५/२०२३ चे सकाळी ०९.०० वा. ते २१.०० वा. पोवेतो पोस्टे. ला डि.ओ. डयुटी असतांना पेट्रोंलीग करीता असतांना सोबत पोकॉ क्र. ८२० सह १९.३० वा. दरम्याण गुप्त बातनीदाराकडुन माहीती मिळाली की फत्तेपुर शिवणगाव येथे एक इसम त्याचे घरासमोर अवैध्यरित्या देशी दारु विक्री करीत आहे. अशा माहीती वरुन दोन नमुद पंचाना सोबत घेऊन पो.स्टॉप सह फत्तेपुर शिवणगाव येथे गेलो असता एक इसम त्याचे घरासमोर दारु विक्री करीत असतांना मिळुन आला. त्याला ताब्यात घेऊन पंचासमक्ष नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव ओंकार उकंडराव खडसे वय ६५ वर्ष रा. फत्तेपुर शिवणगाव असे सांगीतले त्याचे ताब्यातुन कापडी थैलीमध्ये देशी दारु बॉबी संत्राचे १८० एम.एल. चे १० नग किंमत अंदाजे ७००/ रु चा माल मिळुन आला . जप्त मालामधुन एक १८० एम.एल .ची दारुची शिशी सिए. करीता वेगळी काढली त्यावर आमचे व पंचाचे सहीचे लेबल लावुन जागीच सिल केले . वरील नमुद आरोपीचे कृत्य कलम ६५ (ई) मदाका प्रमाणे होत असुन फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ४. | पोस्टे. नांदगाव पेठ | अप.न. १८७/२०२ ३ कलमं ६५(ई) मदाका | जळका शहापुर | दि. २१/०५/२ ०२३ चे १९. ५० वा. | दि. २१/०५ /२०२३ चे २२.५२ वा. | पो.उपनि. गजानन लोकडे वय २८ वर्ष पोस्टे. नांदगाव पेठ | आनंद सयमेसिंग भोसले वय ३५ वर्ष रा. जळका शहापुर ता. जि. अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहेकी दि. २१/०५/२०२३ चे सकाळी ०९.०० वा. ते २१.०० वा. पोवेतो पोस्टे. ला डि.ओ. डयुटी असतांना पेट्रोंलीग करीता असतांना सोबत पोकॉ क्र. ८२० सह १९.५० वा. दरम्याण गुप्त बातनीदाराकडुन माहीती मिळाली की जळका शहापुर येथे एक इसम अवैध्यरित्या गावठी हातभट्टी ची दारु विक्री करीत आहे. अशा माहीती वरुन दोन नमुद पंचाना सोबत घेऊन पो.स्टॉप सह जळका शहापुर येथे गेलो असता सदर इसमावर प्रो. रेड केली असता सदर इसम हा एका प्लॉस्टीक डबकी मध्ये गावठी हातभट्टी ची दारु विक्री करीत असतांना मिळुन आला. त्याला ताब्यात घेऊन पंचासमक्ष नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव आनंद सयमेसिंग भोसले वय ३५ वर्ष रा. जळका शहापुर असे सांगीतले त्याचे ताब्यातील डबकी मध्ये ५ लिटर गावठी हात भट्टीची दारु किंमत अंदाजे ५००/ रु चा माल मिळुन आला . जप्त मालामधुन एक १८० एम.एल .ची हा.भ. दारुची शिशी सिए. करीता वेगळी काढली त्यावर आमचे व पंचाचे सहीचे लेबल लावुन जागीच सिल केले . वरील नमुद आरोपीचे कृत्य कलम ६५ (ई) मदाका प्रमाणे होत असुन फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | नागपुरीगेट | अप.क्र. २४४/२०२३ कलम ६५ई महा. दा. का. | अमरावती | २१/०५/२०२३ चे २०.०० वा ते २०.३० वाञ | २१/०५/२०२३ चे २१.३० वा. | सर.तर्फ पोहेकॉ कैलास जाधव ब.नं १२९६ पो.स्टे. नागपुरीगेट अमरावती शहर | एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व पोलीस स्टॉपसह पेट्रोलींग डयुटी करित असतांना गुप्त बातमीदाराचे माहितीवरुन प्रोव्ही रेड केली असता ११ नग देशी दारु पवटया किंमत ४२० रु ५ नग बॉबी संत्रा देशी दारुच्या पावटया किंमत ३५० रु असा एकुण ७७० रु. चा माल पंचा समक्ष आरोपीचे ताब्यातुन जप्त केला. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ६. | वलगांव | अप क्र. १६५/२०२३ कलम ६५ (ई) म. द. का | वलगांव | दि. २१/०५/२०२३ चे १९/१५वा माहीती दि. २१/०५/२०२३ चे १९/१५ वा | दि. २१/०५/२०२३ चे २०/३६ वा | पो उप नि रविद्र खेडेकर पो. स्टे. वलगांव अमरावती शहर | एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांची पो. स्टे. हजर ड्युटी असतांना गुप्त बातमीदारा कडुन खात्री लायक बातमी मिळाली की देवीपुरा वलगांव येथे एक महिला अवैध्यरित्या देशी दारुची विक्री करीत आहे. अशा माहीती वरुन व. पो. नि. अहेरकर सर यांना माहीती देवुन पोलीस स्टॉप व पंचा सह खाजगी वाहणाने वलगांव गावात बाजार चौकात गेलो असता एक महीला तीचे हाता माध्ये पिशवी घेवुन दिसली पंचा समक्ष महीला कर्मचारी नि तीला ताब्यात घेवुन तीच्या जवळील पिशवीची पाहणी केली असता त्या मध्ये देशी दारु बाँबी संत्रा ९० एम एल च्या १५ पावट्या कि. अंदाजे ६००/- रु चा माल मिळुन आला सदर महिला आरोपी ही आपले ताब्यात विनापरवाना देशी दारु बाळगुन विक्री करीता असतांना मिळुन आली सदर महीला आरोपीचे कृत्य कलम ६५ (ई) म. द. का प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| ७. | पो ठाणे कोतवाली . | अप क्र.२२२/२३कलम ६५(ई) मदाका | अमित मेडिकल समोर प्रभात चौक अमरावती | दि.२१.०५.२३ चे १६.२५ वा | दि.२१.०५.२३ चे १९.०८ वा | सरतर्फे स पो उप नि रंगराव जाधव ब.नं ९२१ पो स्टे सिटी कोतवाली | शेख शोएब शेख करिम वय २३ वर्ष रा अलिम नगर अमरावती | दि.२१.०५.२३ रोजी १४.०० वा ते २१.०० वा पावेतो पो स्टे सीटी कोतवाली येथे पो स्टे हद्दी मध्ये आम्ही व पोलीसस्टाफ ना पो का ३२८ ,१२ असे पेट्रोलिंग करीत असतांना शाम चौक येथे १६.२५ वा गुपत् बातमी दाराकडुन खात्रीलायक बातमी मिळाली की, एक ईसम हा अमित मेडिकल जवळ प्रभात चौक सार्वजनिक ठिकाणी आपले हातात एका कापडिच्या पिशवीमध्ये अवैध्यरित्या विदेशी दारु विक्री साठी घेवुन जात आहे अशा खबरेवरुन आम्ही व सोबत पंचनाम्यातील पंचांना घेवुन खाजगी वाहनाने अमित मेडिकल समोर गेलो असता एक ईसम आपली कापडाची पिशवी घेवुन येतांना दिसला यास जागिच पकडुन त्यास पंचासमक्ष त्याचे नाव गाव विचारले असता त्यो आपले नाव शेख शोएब शेख करिम वय २३ वर्ष रा अलिम नगर अमरावती असे सांगितले त्याचे ताब्यातील पिशवीची पाहनी केली असता 20 नग ऑफिसर चॉईस न्यु ब्लु विदेशी दारु कंपनिच्या पावट्या प्रत्येकी १८० एम एल च्या कि.अं.३०००/- रु चा प्रो व्ही माल.मिळुन आला त्यास सदर मालाचे परवाना बाबत विचारले असता त्याचे जवळ परवाना नसल्याबाबत सांगितले वरुन सदरचा माल पंचासमक्ष पंचनामा करुन जागिच जप्त करन्यात आला.व जप्त मालातुन सि ए सैंम्पल करीता एक १८० एम एल ऑफिसर चॉईस न्यु ब्लु विदेशी दारु वेगळी काढुन त्यावर आमचे पंचाचे व आरोपीचे सहिचे कागदी लेबल लावुन लाखेचे सिल केले.वरील आरोपीचे कृत्य ६५ ई मदाका प्रमाने होत असल्याने त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | भातकुली. | अपक्र 105/23 कलम 65(ई) मदाका. | आरोपी च्या राहत्या घरा समोर खालकोणी | दि 21/05/2023 चे 20/30 वा ते 21.00 वा | दि. 21.05.2023 चे 21.50वा | सरतर्फे GPSI प्रेमदास इंगळे पोस्टे भातकुली | चरणदास उत्तमराव रौराळे वय 58 वर्षे रा. खालकोणी | हकीकत- अशा प्रकारे आहे की, नाकाबंदी दरम्याण गुप्त बातमीदारा यांच्या कडुन मिळालेल्या खात्रीलायक बातमी वरुन पोस्टॉप च्या मदतीने नमुद घटनास्थळी आरोपीवर प्रोव्ही रेड केला असता आरोपीचे ताब्यातुन 48 नग बॉबी संत्रा कंपनिचा 180 एम.एलच्या पावट्या किमंत 3840/-रु चा माल मिळुन आल्याने सदरचा गुन्हा दाखल |